**मराठवाड्यातील मराठा समाजास मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जात प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेमध्ये आवश्यक त्या अनिवार्य निजामकालीन पुरावे, वंशावळी, शैक्षणिक पुरावे, महसूली पुरावे, निजामकाळात झालेले करार, निजामकालीन संस्थानिकांनी दिलेल्या सनदी, राष्ट्रीय दस्तावेज इत्यादी पुराव्यांची वैधानिक व प्रशासकीय तपासणी करण्याबाबत तसेच, तपासणीअंती पात्र व्यक्तींना मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जातीचे जात प्रमाणपत्र देण्याची कार्यपध्दती विहित करण्यासाठी निवृत्त न्यायमुर्ती यांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापण्याबाबत..**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
शासन निर्णय क्रमांक : मआसु- २०२३/प्र.क्र.०३ /१६-क
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ०७ सप्टेंबर, २०२३

<u>वाचा :</u>

१) महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण व समाजकल्याण विभागाचा दि.१३ ऑक्टोबर, १९६७ रोजीचा शासन निर्णय
२) महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २०००
३) महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभागाचा दि.१ जून, २००४ रोजीचा शासन निर्णय
४) महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची दि.१ सप्टेंबर, २०१२ रोजीची अधिसूचना
५) महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे दि.२८ फेब्रुवारी, २०१८ रोजीचे परिपत्रक
६) समक्रमांकीत दि.२९ मे, २०२३ रोजीचा शासन निर्णय

<u>प्रस्तावना :</u>

राज्यातील मागासवर्गीय व्यक्तीस जात प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन हे वाचा येथे नमूद अ.क्र.२ येथील महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० नुसार करण्यात येते. त्याअंतर्गत वाचा येथे नमूद अ.क्र.४ येथील शासन अधिसूचना दि.१ सप्टेंबर, २०१२ अन्वये महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २०१२ नुसार जात प्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करण्यात येते.

राज्यातील इतर मागासवर्ग प्रवर्गाची यादी वाचा येथे नमूद अ.क्र.१ येथील शासन निर्णय दि.१३ ऑक्टोबर, १९६७ अन्वये निर्गमित केलेली आहे. यामध्ये अ.क्र.८३ वर कुणबी जातीचा उल्लेख आहे. महाराष्ट्रातील इतर मागासवर्ग प्रवर्गाच्या यादीत सुधारणा करण्याबाबत वाचा येथे नमूद अ.क्र.३ येथील शासन निर्णय दि.१ जून, २००४ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. त्याद्वारे अ.क्र.८३ वरील कुणबी जातीची तत्सम जात म्हणून मराठा-कुणबी व

कुणबी-मराठा यांचा समावेश करण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे जात प्रमाणपत्र मिळण्यासाठी होत असलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने जात प्रमाणपत्र सुलभरित्या उपलब्ध करुन देण्यासाठी वाचा येथे नमूद अ.क्र.५ येथील दि.२८ फेब्रुवारी, २०१८ रोजीच्या परिपत्रकाद्वारे मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. सदर परिपत्रकातील परिच्छेद क्र.३ अन्वये कु, कुण-कुणबी इत्यादी अशा जुन्या नोंदींची इतर पुराव्याशी सुसंगतता तपासून जातीचे प्रमाणपत्र निर्गमित करण्याबाबत योग्य निर्णय सक्षम प्राधिका-याने घ्यावा, असे प्रतिपादन करण्यात आलेले आहे. सदर परिपत्रकातील परिच्छेद क्र.४ अन्वये जुन्या कागदपत्रातील जातीच्या नोंदी, जात प्रमाणपत्र देण्यासाठी महत्त्वाचे पुरावे ठरतात असे निःसंदिग्धपणे नमूद करण्यात आलेले आहे.

राज्याच्या मराठवाडा विभागात मराठा समाजास मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जातीचे जात प्रमाणपत्र मिळण्यास येत असलेल्या अडचणी विचारात घेऊन मराठवाड्यातील मराठा समाजास मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जातीचे जात प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेमध्ये सुसूत्रता येण्यासाठी अभ्यासाअंती शासनास शिफारशी करण्यासाठी अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे अध्यक्षतेखाली वाचा येथे नमूद अ.क्र.६ येथील दि.२९ मे, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती स्थापन करण्यात आली आहे.

तथापि, मराठवाड्यातील मराठा समाजास मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जातीचे जात प्रमाणपत्र देण्याच्या विषयास अनुलक्षून अंतिम करावयाची कार्यपध्दती प्रशासकीय व वैधानिक दृष्टीने सुयोग्य होण्यासाठी अधिक प्रभावी उपाययोजना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. तद्नुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :**

मराठा समाजातील ज्या व्यक्तींनी मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जातीच्या जात प्रमाणपत्राची मागणी केली असेल अशा व्यक्तींनी सादर केलेल्या निजामकालीन महसूली अभिलेखात, शैक्षणिक अभिलेखात तसेच अन्य अनुषंगिक समर्थनीय अभिलेखात जर त्यांच्या वंशावळीचा उल्लेख “कुणबी” असा असेल, तर अशा व्यक्तींनी सादर केलेल्या पुराव्यांची काटेकोर तपासणी करुन त्यांना मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जातीचे जात प्रमाणपत्र प्रदान करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे मराठवाड्यातील मराठा समाजास मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जातीचे जात प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेमध्ये आवश्यक त्या अनिवार्य पुराव्यांची वैधानिक व प्रशासकीय तपासणी करण्याबाबत तसेच, तपासणीअंती पात्र व्यक्तींना मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जातीचे जात प्रमाणपत्र देण्याची कार्यपध्दती विहित करण्यासाठी मा.न्यायमुर्ती श्री संदीप शिंदे (निवृत्त) यांचे अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे समिती स्थापन करण्यास याद्वारे शासन मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | मा.न्यायमुर्ती श्री संदीप शिंदे (निवृत्त) | अध्यक्ष |
| २ | अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग | सदस्य |
| ३ | प्रधान सचिव, विधि व न्याय विभाग | सदस्य |
| ४ | संबंधित जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी | सदस्य |
| ५ | विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग | सदस्य सचिव |

२. इतर प्रशासकीय विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव यांना आवश्यकतेनुसार समितीच्या बैठकींना आमंत्रित करण्यात यावे.

३. **समितीची कार्यकक्षा -** समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील.

अ) मराठवाडा विभागातील मराठा समाजातील व्यक्तींना मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जातीचे जात प्रमाणपत्र देण्यासंदर्भात संबंधित व्यक्तींनी सक्षम प्राधिकारी यांचेकडे कुणबी जातीसंदर्भात सादर केलेल्या निजामकालीन पुरावे, वंशावळी, शैक्षणिक पुरावे, महसूली पुरावे, निजामकाळात झालेले करार,

निजामकालीन संस्थानिकांनी दिलेल्या सनदी, राष्ट्रीय दस्तावेज इत्यादी पुराव्यांची वैधानिक व प्रशासकीय तपासणी कशी करावी व तपासणीअंती मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जातीचे जात प्रमाणपत्र पात्र व्यक्तींना देण्याबाबतची कार्यपध्दती निश्चित करणे.

ब) प्रस्तुत समितीचे कामकाज सुलभपणे पार पाडण्यासाठी वाचा येथे नमूद अ.क्र.६ येथील दि.२९.५.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेली समिती या समितीस सहाय्य करेल.

४. **समितीचा कार्यकाळ** - प्रस्तुत समितीने एक महिन्यात अहवाल शासनास सादर करावा.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२३०९०७१५०८१३४२०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SUMANT NAMDEORAO BHANGE

Digitally signed by SUMANT NAMDEORAO BHANGE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SOCIAL JUSTICE AND SPECIAL ASSISTANCE DEPARTMENT, 2.5.4.20=17b7f71196a30f5dadd3859d04bf654ed8b2dd1177972936de56dcefe4daa38e, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=1FB1B48850CC3E5A74179F14C10EC607D89BEA3022F75E225829CC7525E64558, cn=SUMANT NAMDEORAO BHANGE
Date: 2023.09.07 15:35:28 +05'30'

**( सुमंत भांगे )**
**शासनाचे सचिव**

**प्रत,**

१) मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३) मा.उप मुख्यमंत्री (गृह, विधि व न्याय) यांचे सचिव
४) मा.उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे प्रधान सचिव
५) मा.सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव
६) मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/ विधानसभा
७) सर्व विधानसभा सदस्य/ विधानपरिषद सदस्य
८) मा.न्यायमुर्ती श्री संदीप शिंदे (निवृत्त)
९) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
१०) अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
११) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा)
१२) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानपरिषद)
१३) विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद
१४) जिल्हाधिकारी, औरंगाबाद/जालना/बीड/उस्मानाबाद/नांदेड/लातूर/परभणी/हिंगोली
१५) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
१६) आयुक्त, समाजकल्याण, पुणे
१७) आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक
१८) आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
१९) निवडनस्ती

**मा.न्यायमूर्ती श्री संदीप शिंदे (निवृत्त) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीच्या स्वीकृत केलेल्या पहिल्या अहवालाच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : मआसु- २०२३/प्र.क्र.०३ /१६-क**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ३१ ऑक्टोबर, २०२३

**वाचा :**

सा.प्र.वि. शा.नि.क्र. मआसु- २०२३/प्र.क्र.०३ /१६-क दि. ०७ सप्टेंबर, २०२३

**प्रस्तावना :**

राज्याच्या मराठवाडा विभागातील मराठा समाजातील व्यक्तींना मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जातीचे जात प्रमाणपत्र देण्यासंदर्भात संबंधित व्यक्तींनी सक्षम प्राधिकारी यांचेकडे कुणबी जातीसंदर्भात सादर केलेल्या निजामकालीन पुरावे, वंशावळी, शैक्षणिक पुरावे, महसूली पुरावे, निजामकाळात झालेले करार, निजामकालीन संस्थानिकांनी दिलेल्या सनदी, राष्ट्रीय दस्तावेज इत्यादी पुराव्यांची वैधानिक व प्रशासकीय तपासणी कशी करावी व तपासणीअंती मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जातीचे जात प्रमाणपत्र पात्र व्यक्तींना देण्याबाबतची कार्यपध्दती विहित करण्यासाठी मा.न्यायमूर्ती श्री संदीप शिंदे (निवृत्त) यांचे अध्यक्षतेखाली सामान्य प्रशासन विभागाच्या दि ७.९.२०२३.च्या शासन निर्णयान्वये समिती स्थापन करण्यात आली आहे.

२. मा.न्यायमुर्ती श्री. संदीप शिंदे (निवृत्त) समितीने दि.११.९.२०२३, दि.१५.९.२०२३, दि.२२.९.२०२३ रोजी बैठका घेऊन जिल्हानिहाय अभिलेख तपासणी कामाचा आढावा घेतला. तसेच तपासलेल्या नोंदी बाबत शासनास अहवाल सादर करण्यासाठी मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांसाठी एकच प्रकारचा नमुना तयार करून अभिलेख्यांची तपासणी करण्याचे निर्देश समितीने संबंधित ८ जिल्हाधिकाऱ्यांना दिले होते.-

अ) महसूली अभिलेखे - खासरापत्रक, पाहणीपत्रक, क-पत्रक, कुळ नोंदवही, नागरिकांचे राष्ट्रीय रजिस्टर सन १९५१, नमुना नं.०१ हक्क नोंदपत्रक, नमुना नं.०२ हक्क नोंदपत्रक व ७/१२ उतार

ब) जन्म-मृत्यू रजिस्टर संबंधिचे अभिलेखे (गाव नमुना नं.१४)

क) शैक्षणिक अभिलेखे- प्रवेश निर्गम नोंदवही / जनरल रजिस्टर,

ड) राज्य उत्पादन शुल्क विभागाकडील अभिलेखे- अनुज्ञप्ती नोंदवह्या, मळी नोंदवही, ताडी नोंदवही, आस्थापना अभिलेख,

इ) कारागृह विभागाचे अभिलेखे - रजिस्टर ऑफ अंडर ट्रायल प्रिझनर, कच्चा कैद्यांची नोंदवही,

ई) पोलीस विभागाचे अभिलेखे- गाववारी, गोपनीय रजिस्टर सी-१, सी-२, क्राईम रजिस्टर, अटक पंचनामे व एफ आय आर रजिस्टर

उ) सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी यांचेकडील अभिलेखे - खरेदीखत नोंदणी रजिस्टर, डे बुक, करारखत, साठेखत, इसार पावती, भाडे चिठ्ठी, ठोकेपत्रक, बटाईपत्रक, दत्तकविधानपत्रक, मृत्युपत्रक, ईच्छापत्रक, तडजोडपत्रक, इतर दस्त,

ऊ) भूमी अभिलेख विभागाचे अभिलेखे - पक्काबुक, शेतवारपत्रक, वसूली बाकी, ऊल्ला प्रतीबुक, रिव्हीजन प्रतीबुक, क्लासर रजिस्टर व हक्क नोंदणीपत्रक,

ए) जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांच्याकडील अभिलेखे - माजी सैनिकांच्या नोंदी,

ऐ) जिल्हा वफ्क अधिकारी यांच्याकडील अभिलेखे - मुंतखब

ओ) शासकीय कर्मचा-यांचा सेवा तपशीलबाबतची अभिलेखे - सन १९६७ पूर्वीचे कर्मचा-यांचा सेवा तपशील.

औ) जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडील अभिलेखे - वैध व अवैध प्रकरणांचा तपशील व कारणे.

३. त्यानुसार संबंधित सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्याकडील उपलब्ध अभिलेख समितीला तपासणीसाठी तयार ठेवले. त्यानुसार मा.न्यायमूर्ती श्री. संदीप शिंदे (निवृत्त) समितीने मराठवाडा विभागातील सर्व आठ जिल्ह्यांमध्ये जिल्हानिहाय बैठका घेण्याचे व आम नागरीकांकडून कुणबी नोंदी संबधी पुरावे स्विकारण्याचे ठरवून तसा समितीचा जिल्हानिहाय दौरा कार्यक्रम तयार केला व दौऱ्याच्यावेळी त्यानुसार छत्रपती संभाजीनगर विभागातील सर्व जिल्ह्यांमध्ये विविध विभागांच्या अभिलेख्यांतील दि. ३०.१०.२०२३ पर्यंत १,७४,४५,४३२ नोंदीची तपासणी करण्यात आली असून त्यामध्ये कुणबी जातीच्या १३,४९८ नोंदी आढळून आल्या. तसेच समितीस मराठवाड्यातील आढावा बैठकीत नागरीकांनी भेटून दिलेले ४६० पुरावे सादर करण्यात आले. सदर तपासणी दरम्यान जुन्या अभिलेख्यातील बहुतांश नोंदी मोडी लिपी अथवा उर्दू भाषेतील आहेत. या सर्व नोंदीची मा.न्यायमूर्ती श्री संदीप शिंदे (निवृत्त) समितीने तपासणी करून दि.३०.१०.२०२३ रोजीच्या मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली मराठा आरक्षण व सुविधा मंत्रीमंडळ समितीच्या झालेल्या बैठकीत आपला पहिला अहवाल सादर केला आहे. सदर अहवाल मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली मराठा आरक्षण व सुविधा मंत्रीमंडळ उपसमितीने मंत्रिमंडळ बैठकीत सादर करण्याची शिफारस केली आहे. त्यानुसार मा.मंत्रिमंडळाने मा.न्यायमूर्ती श्री संदीप शिंदे (निवृत्त) समितीचा पहिला अहवाल स्वीकृत केला आहे. त्या अनुषंगाने कुणबी जातीचे जात प्रमाणपत्र देण्यासंदर्भात खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

**<u>शासन निर्णय :</u>**

अ) ज्यांच्या नोंदी मा.न्यायमूर्ती श्री संदीप शिंदे (निवृत्त) समितीस आढळून आल्या अशा व्यक्तींना कुणबी जातीचे जात प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही सक्षम प्राधिकारी यांनी सुरू करावी.

ब) मोडी,उर्दू भाषेतील दस्तावेजाचे भाषांतर करून जतन करण्यासाठी ते डिजीटाइज व प्रमाणित करून पब्लिक डोमेनवर आणून त्या आधारे कुणबी जातीचे जात प्रमाणपत्र देण्यात यावे.

क) मा. न्यायमूर्ती श्री. संदीप शिंदे समितीस सादर करण्यात आलेले १२ विभागांचे पुरावे ग्राह्य धरण्यासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या महाराष्ट्र अनूसुचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातींचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २०१२ मध्ये सुधारणा करावी.

ड) मा.न्यायमूर्ती श्री संदीप शिंदे (निवृत्त) यांच्या अहवालातील शिफारशीनुसार मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जातीचे जात प्रमाणपत्र देण्याच्या कार्यपद्धतीचा अवलंब करावा.

इ) मा. न्यायमूर्ती दिलीप भोसले (निवृत्त), मा. न्यायमूर्ती मारोती गायकवाड (निवृत्त) आणि मा. न्यायमूर्ती संदीप शिंदे (निवृत्त) यांचे सल्लागार मंडळ स्थापन करून या सल्लागार मंडळाच्या अध्यक्षपदी मा. न्यायमूर्ती दिलीप भोसले (निवृत्त) यांच्या नेमणूकीस मान्यता देण्यात यावी. सदर सल्लागार मंडळ मा.सर्वोच्च न्यायालय, मा.उच्च न्यायालय व इतर न्यायालयात प्रलंबित असलेल्या मराठा आरक्षण संदर्भातील प्रकरणांमध्ये शासनास कायदेशीर बाबींसंदर्भात मार्गदर्शनपर सल्ला देईल.

ई) मराठा समाजाचे सामाजिक व शैक्षणिक मागासलेपण तपासणी करण्यासाठी राज्य मागासवर्ग आयोगाला नव्याने इम्पेरीकल डाटा गोळा करण्याबाबत कळविण्यात येईल.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०२३१०३११८५६५९४७०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SUMANT NAMDEORAO BHANGE

Digitally signed by SUMANT NAMDEORAO BHANGE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SOCIAL JUSTICE AND SPECIAL ASSISTANCE DEPARTMENT, 2.5.4.20=17b7f71196a30f5dadd3859d04bf654ed8b2dd117797293 6de56dcefe4daa38e, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=1FB1B48850CC3E5A74179F14C10EC607D89BEA302 2F75E225829CC7525E64558, cn=SUMANT NAMDEORAO BHANGE
Date: 2023.10.31 18:57:01 +05'30'

**( सुमंत भांगे )**
**शासनाचे सचिव**

**प्रत,**

१) मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव

२) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव

३) मा.उप मुख्यमंत्री (गृह, विधि व न्याय) यांचे सचिव
४) मा.उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे प्रधान सचिव
५) मा.सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव
६) मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/ विधानसभा
७) सर्व विधानसभा सदस्य/ विधानपरिषद सदस्य
८) मा. न्यायमूर्ती दिलीप भोसले (निवृत्त)
९) मा. न्यायमूर्ती. मारोती गायकवाड (निवृत्त),
१०) मा. न्यायमूर्ती श्री संदीप शिंदे (निवृत्त)
११) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
१२) अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
१३) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा)
१४) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानपरिषद)
१५) सर्व विभागीय आयुक्त
१६) सर्व जिल्हाधिकारी
१७) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
१८) आयुक्त, समाजकल्याण, पुणे
१९) आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक
२०) आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
२१) निवडनस्ती